R.No.E-172(Rtg.) Tel. (02355) 270169

Margtamhane Education Society's

**DR.TATYASAHEB NATU COLLEGE OF ARTS AND SENIOR COLLEGE OF COMMERCE**

**Margtamhane, Tal.Chiplun, Dist.Ratnagiri. 415702 (M.S.)**

(Affiliated to Mumbai University)

(NAAC Accredited 'B' Grade)

Email.natucollege@gmail.com

O/W No. TNC/Lib-1/262 Date 17/10/2016

## 'वाचन प्रेरणा दिन' या कार्यक्रमाचा अहवाल

आज शनिवार दि. १५/१०/२०१६ रोजी डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम (माजी राष्ट्रपती) यांच्या ८५ व्या जयंती निमित्त 'वाचन प्रेरणा दिन' कार्यक्रम **ग्रंथालय व मराठी विभाग** यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. तात्यासाहेब नातू कला व वरिष्ठ वाणिज्य महाविद्यालय मार्गताम्हाने, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी येथे साजरा करण्यात आला. त्या निमित्त **" कथा, कादंबरी, कविता व नाटक यांचे वाचन व सादरीकरण** महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी केले. त्याचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे.

या कार्यक्रमाला मार्गताम्हाने एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष मा. श्री जयसिंगराव मोरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य विजयकुमार अप्पासाहेब खोत हे होते.

सुरुवातीला प्रमुख पाहुणे श्री जयसिंगराव मोरे यांचे स्वागत महाविद्यालयाचे प्राचार्य विजयकुमार खोत यांनी केले तसेच मंचावर उपस्थित प्राचार्य विजयकुमार खोत व प्रा. एस. एन. रावळ यांचे स्वागत महाविद्यालयीन ग्रंथपाल श्री अनिल एस. कांबळे यांनी केले. त्यानंतर डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रास्ताविक व सूत्र संचालन प्रा. सौ. आर. पी. कदम (मराठी विभाग प्रमुख ) यांनी केले. त्यामध्ये त्यांनी वाचनाचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. श्री जयसिंगराव मोरे यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना 'आजच्या मोबाईल व टी.व्ही. च्या युगामध्ये वाचन संस्कृती लोप पावत आहे तिचे जतन करण्यासाठी विध्यार्थीवर्गाने वाचन करणे गरजेचे आहे, जर विद्यार्थ्यांनी वाचन केले नाही तर त्यांची प्रगती थांबेल, तसेच 'वाचाल तर वाचाल' ही म्हण समजावून सांगितली.

यानंतर महाविद्यालयातील(T.Y.B. Com.)मधील कु. प्रियंका जाधव, कु. सोनाली बेंद्रे, कु.निकिता बाईत यांनी वि. वा. शिरवाडकरांच्या "दुसरा पेशवा" या अत्यंत गाजलेल्या नाटकातील 'काशीबाई- मस्तानी' भेट हा प्रसंग सादर केला.

यानंतर विवेक जाधव याने 'व्यक्ती आणि वल्ली' मधील 'सखाराम गटणे' ही व्यक्तिरेखा सादर केली. त्यानंतर विक्रांत टेरवकरने मंगेश पाडगावकर यांच्या 'वात्रटिका' मधील विनोदी चारोळ्या सादर केल्या. यानंतर 'सुर्यावरचा

अंधार' कृष्णकुंज यांच्या 'काला सुरज' या कथेवर आधारित नाटकातील एक प्रवेश कु. प्रियंका जाधव, कु. सोनाली बेंद्रे, कु.निकिता बाईत,कु. प्रज्ञा कदम, कु. प्रियंका खातु, केशव केशिरेडकर व विवेक जाधव यांनी सादर केला. सर्वात शेवटी कु. शुभका हळदे (F.Y.B.Com.) हिने सानेगुरुजी लिखित 'श्यामची आई' या ग्रंथातील 'रघुपती राघव राजाराम' या कथेचे वाचन केले. या सर्व विद्यार्थ्यांना प्रा. राजश्री कदम यांनी मार्गदर्शन केले होते.

आभार प्रदर्शन ग्रंथपाल श्री अनिल एस. कांबळे यांनी केले व कार्यक्रमाची सांगता झाली.

सदर कार्यक्रमास उपस्थित पाहुणे, विद्यार्थी व शिक्षकवृंदाचा उत्कृष्ट प्रतिसाद लाभला.

ASKamble
(श्री अनिल एस. कांबळे)
LIBRARIAN
Dr. Tatyasaheb Natu College of Arts &
Senior College of Commerce Margtamhane,
Tal.Chiplun, Dist.Ratnagiri-415702

R. P. Kadam
(प्रा. सौ. राजश्री कदम)
(मराठी विभाग प्रमुख)

(विजयकुमार अप्पासाहेब खोत)
PRINCIPAL
Dr. Tatyasaheb Natu College of Arts &
Senior College of Commerce Margtamhane,
Tal.Chiplun, Dist.Ratnagiri-415702